महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०१५

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

उदगीर (जि.लातूर) शहारासाठी देवर्जन मध्यम प्रकल्पातून पाणी पुरवठा करण्यासाठी नवीन योजना करण्याबाबत

(१) १३०७ (२२-१२-२०१४). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर (जि.लातूर) शहारापासून २० कि.मी. अंतरावर असलेल्या देवर्जन मध्यम प्रकल्पातून उदगीरला पाणी पुरवठा करण्यासाठी नवीन योजना मंजूर करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही योजना मंजूर करताना जी कागदपत्रे सादर करण्यात आली ती चुकीची व शासनाची दिशाभूल करणारी असून कागदपत्रे दाखल करुन तात्पुरती पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू योजनेसाठी सादर केलेल्या सर्व कागदपत्रांची चौकशी करुन शासनाची दिशाभूल करणारे कागदपत्र दाखल करणाऱ्या अधिकारी व ठेकेदारावर कायदेशीर गुन्हे दाखल करावेत असे निवेदन नगर परिषद सदस्याने मा.पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्र्यांकडे सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनानुसार कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय ?

श्री. बबनराव लोणीकर (२८-०५-२०१५) : (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) होय. प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने अहवाल मागविण्यात आला असून, सदर अहवाल शासनास अद्याप अप्राप्त आहे.

तथापि, सदर योजनेचा प्रस्ताव विहीत मार्गाने शासनास सादर करण्यात आला असल्याने, त्यामूळे सादर केलेली कागदपत्रे दिशाभुल करणारी असे म्हणणे संयुक्तिक नाही. त्यामुळे कारवाईची आवश्यकता नाही. असे जिल्हाधिकारी, लातूर यांनी कळविले आहे.

अचलपुर व चांदुर बाजार (जि.अमरावती) या तालुक्यातील १४५ गावांच्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेस तातडीने प्रशासकीय मान्यता देणेबाबत

(२) ३६४७ (१५-०१-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपुर व चांदुर बाजार (जि.अमरावती) या तालुक्यातील राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमाअंतर्गत १४५ गावांच्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेस तातडीने प्रशासकीय मान्यता द्यावी अशी मागणी लोकप्रतिनिधी यांनी तत्कालीन मा.मंत्री पाणीपुरवठा व स्वच्छता यांचेकडे दिनांक २५ जुलै, २०१४ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (०९-०४-२०१५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) मा.मंत्री, पाणी पुरवठा स्वच्छता यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०६.०८.२०१४ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नागरी व ग्रामीण योजना मंडळ ठाणे यांनी, अचलपूर व चांदुर बाजार (जि.अमरावती) या तालुक्यातील १४५ गावांऐवजी ८३ गावांची प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेस दिनांक २३.०१.२०१५ रोजी तांत्रिक मंजुरी मिळाली आहे. सदर प्रस्ताव दिनांक २५.०२.२०१५ रोजी शासनास प्रशासकीय मंजुरीसाठी प्राप्त झाला असून शासन स्तरावर तपासणी सुरु आहे.

वाशिम जिल्ह्यातील मालेगाव येथे सांडपाणी व्यवस्थापन कार्यक्रम राबविण्याबाबत

(३) ४२८२ (२३-१२-२०१४). श्री.अमित झनक (रिसोड) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील मालेगाव येथे नाबार्डच्या अर्थसहाय्याने सांडपाणी व्यवस्थापन कार्यक्रम राबविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अद्ययावत तंत्रज्ञान सहाय्य, नाशिक यांच्याकडून मान्यता मिळाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, याबाबत शासनाची स्पष्ट भुमिका काय आहे ?

श्री. बबनराव लोणीकर (३०-०१-२०१५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, सदर प्रकल्पास मुख्य अभियंता, अद्ययावत तंत्रज्ञान सहाय्य, नाशिक यांनी तांत्रिक मान्यता दिली आहे.

(३) ई-निविदा पध्दतीने निविदा मागविण्यात आल्या होत्या. परंतू कुणीही कंत्राटदार आर्थिक देकार उघडण्यास पात्र नसल्याने निविदा रद्द करण्यात आल्या असल्याने जिल्हा स्तरावर

नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

तिवसा (जि.अमरावती) येथील ग्रामपंचायतची पाणी पुरवठा योजना मंदगतीने सुरु असल्याबाबत

(४) ४३०२ (१५-०१-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवसा (ता.तिवसा, जि.अमरावती) येथील ग्रामपंचायतची पाणी पुरवठा योजना मंदगतीने सुरु असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्य:स्थितीत १४००० लोकसंख्या असलेल्या तिवसा गावाला अशुध्द पाणीपुरवठा केला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही वा उपाययोजना केली वा करणार आहे,
(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

श्री. बबनराव लोणीकर (२३-०२-२०१५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) नाही.

तिवसा येथील अस्तीत्वातील स्त्रोताद्वारा गावास पिण्याचा पाणीपुरवठा करण्यात येत असून त्यावर क्लोरीनेशनची प्रक्रिया करुन गावास पाणीपुरवठा करण्यात येतो.

तिवसा या गावासाठी नियमित शाश्वत व शुध्द पाणी पुरवठा करण्यासाठी वर्धा नदीवरुन नळ पाणी पुरवठा योजना प्रगतीपथावर असून जलशुध्दीकरण केंद्रासह योजनेचे काम अंतिम टप्प्यात आहे. माहे मार्च, २०१५ पर्यंत पाणी पुरवठा सुरु करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य सरकारतर्फे पत्रकारांना निवृत्तीवेतन देण्याच्या योजनेबाबत

(५) १४४२९ (०८-०४-२०१५). श्री.नसीम खान (चांदिवली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पत्रकारांना राज्य सरकारतर्फे निवृत्तीवेतन देण्याची योजना सुरु करण्याची घोषणा मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक ४ फेब्रुवारी, २०१५ च्या सुमारास केली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पत्रकारांना निवृत्तीवेतन देण्याबाबत राज्य शासनाने निर्णय घेऊन पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०१५) : (१) हे अंशत:खरे आहे.
(२) व (३) पत्रकारांना निवृत्तीवेतन देण्याच्या दृष्टीने विविध पर्यायांची पडताळणी करण्यात येत आहे.

सहसंचालक, हिवताप व हत्तीरोग, पुणे यांचे विरोधात केलेल्या तक्रारीबाबत

(६) १४४७० (०८-०४-२०१५). श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सहसंचालक, हिवताप व हत्तीरोग, पुणे यांचे विरोधात दुरदर्शनची बोगस बिले, फायलेरिया किट दरकरार नसतांनाही दरपत्रकास दाखवून ३७.२० लक्ष रुपयांची अनावश्यक खरेदी व इतर तक्रारीबाबत मा.मुख्यमंत्री, आरोग्य मंत्री यांच्याकडे दिनांक ५ सप्टेंबर, २०१३ रोजी डॉ.सोळंके यांनी तक्रार दिलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या तक्रार अर्जाची चौकशी करण्यात आलेली आहे काय,
(३) चौकशीअंती तत्कालीन सहसंचालक डॉ.खानंदे यांच्या विरोधात काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कारवाई केली नसल्यास, त्याची कारणे काय व त्यास जबाबदार कोण आहे?

डॉ. दीपक सावंत (१०-०७-२०१५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय.
(३) तत्कालीन संचालक, हिवताप व हत्तीरोग, पुणे यांच्याविरुध्द डॉ.सोळंके यांनी याच विषयाबाबत लाचलुचपत विभागाकडे तक्रार केली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने उघड चौकशी करण्यासाठीचा प्रस्ताव गृह विभागामध्ये विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

भंडारा जिल्ह्याचे सोंड्याटोला सिंचन प्रकल्पातून पाण्याचा उपसा बंद केल्याबाबत

(७) १४५१६ (०८-०४-२०१५). श्री.चरण वाघमारे (तुमसर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्याचे सोंड्याटोला सिंचन प्रकल्पातून पाण्याचा उपसा बंद केल्याचे माहे डिसेंबर, २०१४ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे धान उत्पादकांसमोर सिंचनांचा प्रश्न निर्माण झाला आहे काय,
(३) सदर प्रकल्पाच्या देखभाल दुरुस्तीकडे संबंधित विभागाच्या अधिनस्त यंत्रणेने दुर्लक्ष

करण्याचे कारण काय आहे,

(४) तसेच, अधिकारी व कर्मचा-यांनी टाळाटाळ करुन धान उत्पादक शेतक-यांना त्रास देण्याचे कारण काय,

(५) याबाबत धान उत्पादक शेतक-यांनी नाराजी व्यक्त केली आहे हे खरे आहे काय,

(६) तसेच,शासनाने या योजना नाकारण्याचे कारण काय,

(७) या प्रकरणी शासन उपाययोजना करणार किंवा कसे ?

श्री. गिरीष महाजन (३०-०६-२०१५) : (१) अंशत: खरे आहे.

सोंड्याटोला उपसा सिंचन योजनेद्वारे बावनथडी नदीमधून पाणी उपसा करुन चांदपूर धरणात टाकले जाते. चांदपूर धरण हे ब्रिटीशकालीन धरण आहे. चांदपूर जलाशयाच्या अग्रस्थ नियंत्रकात ३ दरवाजे आहेत. खरीप हंगाम २०१४-१५ दरम्यान या ३ दरवाज्यांपैकी द्वार क्रमांक २ व ३ मध्ये तांत्रिक बिघाड झाला होता. तथापि तात्पुरती उपाययोजना करुन खरीप सिंचन सुरळीत पार पाडण्यत आले.

द्वार दुरुस्ती अत्यावश्यक असल्याने दुरुस्तीकरीता उन्हाळी हंगाम न घेण्याचे ठरले. त्यानुसार चांदपूर प्रकल्पाच्या लाभाधारकांना सुचित करण्यात आले. त्यानुसार ऑक्टोबर, २०१४ पासून सोंड्याटोला उसिंयो मधून चांदपूर जलाशयात पाणी भरणा बंद करण्यात आला.

(२) नाही. खरीप हंगाम २०१४-१५ साठी आवश्यक असलेले २० mm3 पाणी चांदपूर जलाशयात उपलब्ध असल्याने खरीप हंगाम प्रभावित झालेले नाही.

चांदपूर जलाशयाच्या द्वार क्र. २ व ३ ची दुरुस्ती मार्च २०१५ अखेर पूर्ण करण्यात आली.

(३) देखभाल दुरुस्तीकडे दुर्लक्ष करण्यात आलेले नाही.

(४) चांदपूर प्रकल्पातील पाणी उपलब्धतेनुसार सिंचनाचा कार्यक्रम यशस्विरित्या राबविण्यात येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना त्रास देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

चांदपूर जलाशयाच्या अग्रस्थ नियंत्रकातील द्वार क्रमांक २ व ३ ची दुरुस्ती मार्च २०१५ अखेर पुर्ण करण्यात आली आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

सोमेश्वरवाडी (ता.बारामती, जि.पुणे) येथील तिरूपती बालाजी प्रकल्पामुळे होत असलेल्या प्रदुषणाबाबत

(८) १४५२६ (०६-०४-२०१५). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोमेश्वरवाडी (ता.बारामती, जि.पुणे) येथील तिरूपती बालाजी प्रकल्पामुळे होत असलेल्या प्रदुषणाबाबत त्वरित उपाययोजना कराव्यात अन्यथा कारवाई करण्याचा इशारा महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास दिला

होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

श्री. रामदास कदम (१४-०७-२०१५) : (१) होय हे खरे आहे.
(२) सरपंच, ग्रामपंचायत वाघळवाडी, ता.बारामती, जि.पुणे यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रत्यक्ष पाहणीकरुन प्रथम विचाराधीन प्रकल्पास दिनांक २२.१२.२०१४ च्या पत्रान्वये सूचना दिल्या. तथापि, कारखान्याच्या कंपोस्ट प्रकल्पातील पाणी कच्च्या लगून मध्ये साठविण्यात आले होते. त्यातून पाणी झिरपण्याची शक्यता विचारात घेऊन मंडळाने शास्त्रीय पध्दतीने पक्का लगून तयार करण्याकरिता दि. १९.०५.२०१५ च्या "कारणे दाखवा" पत्रान्वये कळविले होते. त्या अनुषंगाने सदर उद्योगाने पक्क्या लगूनचे काम केल्याचे मंडळास कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर विभागात मुलींच्या शासकीय तंत्रनिकेतनाबाबत शासनाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावाबाबत

(९) १४५६२ (०८-०४-२०१५). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर विभागात मुलींच्या शासकीय तंत्रनिकेतनाबाबत शासनाकडे प्रस्ताव प्राप्त झालेला आहे, हे खरे आहे काय,
(२) नागपूर विभाग वगळता महाराष्ट्रातील इतर विभागात मुलींचे शासकीय तंत्रनिकेतन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) वरील प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१६-०७-२०१५) : (१) होय,
(२) नाही. तथापि नागपूर विभाग वगळता महाराष्ट्रातील (१) औरंगाबाद, (लातूर), (२) अमरावती (यवतमाळ) (३) पुणे (तासगाव) या विभागात मुलींचे शासकीय तंत्रनिकेतन कार्यरत आहे. नाशिक व मुंबई विभागामध्ये मुलींचे शासकीय तंत्रनिकेतन कार्यरत नाही.
(३) बाब अद्याप शासनाच्या विचारधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मागासवर्गीयांना जातीचे प्रमाणपत्रासाठी वास्तव्याचा पुरावा द्यावा लागत असल्याबाबत

(१०) १४५६८ (१०-०४-२०१५). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागासवर्गीयांना जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन नियम २०१२ नुसार ओ.बी.सी. साठी १३ ऑक्टोबर १९६७ किंवा त्यापुर्वीचा वास्तव्याचा पुरावा द्यावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ओबीसी उमेदवारास सदर अध्यादेशामुळे (शासकीय कार्यालयातच माहिती उपलब्ध नसल्यामुळे) न्यायालयीन प्रक्रियेतून जावे लागते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पक्रिया सुलभ व सहज व्हावी या करीता या अध्यादेशात काही बदल प्रस्तावीत असल्याने त्याबाबत काही कार्यवाही अथवा बदल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास , विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (१४-०७-२०१५) : (१) जातपडताळणी नियम-२०१२ नुसार मागासवर्गीय व्यक्तींना जातप्रमाणपत्र देणे व त्याच्या पडताळणीचे कामकाज चालते. सदर नियमांनुसार इतर मागासवर्ग या प्रवर्गातील व्यक्तींना अथवा त्यांच्या कुटूंबियांना दि.१३/१०/१९६७ रोजी वा तत्पूर्वी त्यांचा राज्यातील सर्वसाधारण रहिवासी असण्याची अट विहित करण्यात आली आहे, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

जातपडताळणी नियम-२०१२ नुसार जातप्रमाणपत्र व जातपडताळणी प्रमाणपत्र मिळण्याकरिता आवश्यक ते जातीचे पुरावे, कागदपत्रे देण्यात आल्यास, सदर प्रमाणपत्र प्राप्त होण्यास कोणतीही अडचण उद्भवत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

ओ.बी.सी. आर्थिक विकास महामंडळाचे भागभांडवल वाढविण्याबाबत

(११) १४५७९ (०९-०४-२०१५). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ओ.बी.सी. आर्थिक विकास महामंडळाचे राज्य शासनाद्वारे भागभांडवल वाढविण्याचा विचार आहे काय,

(२) असल्यास, या महामंडळातून ओबीसी विद्यार्थ्यांना व्यवसायिक अभ्यासक्रमातील पदव्युत्तर, विदेशी शिक्षणासोबतच पदविका अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक कर्ज योजना सुरू

करण्यात येणार आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (१४-०७-२०१५) : (१) नाही.
(२) व (३) ओ.बी.सी. महामंडळाकडून सन २००० पासूनच इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमातील पदवी व पदव्युत्तर शिक्षणाकरीता शैक्षणिक कर्ज योजना कार्यान्वीत असून राष्ट्रीय महामंडळाकडून उपलब्ध होणाऱ्या वार्षिक पत पुरवठ्यातील मंजूर निधीनुसार सद्य:स्थितीत ही योजना देशातंर्गत व्यावसायिक शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता राबविण्यात येते.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कर्मचा-यांना सेवानिवृत्ती योजना लागू करण्याबाबत

(१२) १४५८५ (०६-०४-२०१५). श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळानंतर स्थापन झालेल्या हरियाणा, पंजाब, कर्नाटक राज्यातील प्रदूषण नियंत्रण मंडळानी त्यांच्या सर्व अधिकारी व कर्मचा-यांना सेवा निवृत्ती योजना लागू केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सेवानिवृत्ती योजनेसाठी सुमारे १२० कोटी रुपये राखीव ठेवले असूनही व सहावे वेतन आयोग दिनांक १ जानेवारी, २००६ रोजी लागू झाल्यापासून सदर आयोग सेवानिवृत्त योजनेस लागू करण्याबाबतची मंजूरी अद्यापही मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक १ जानेवारी, २००६ पासून रुपये १२० कोटींच्या व्याजावर सेवानिवृत्त योजना राबविता येईल असा अहवाल स्टेट बँक, एलआयसी व इतर वित्तीय संस्थांनी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर सेवानिवृत्त योजना राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. रामदास कदम (०१-०७-२०१५) : (१) कर्नाटक प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक १/४/२००६ पासून नव्याने दाखल झालेल्या त्यांच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतन योजना लागू केली आहे. तसेच त्यापूर्वी सेवेत दाखल झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी पूर्वीची सेवा निवृत्तीवेतन योजना लागू आहे.
(२) होय.
(३) एसबीआय लाईफ (SBI Life) या संस्थेने मंडळास अहवाल सादर केला आहे. त्यानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या १५८ व्या बैठकीपुढे प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

परंतु, त्यावर अंतिम निर्णय झालेला नाही.

(४) व (५) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन योजना लागू करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला होता. तथापि, वित्त विभागाच्या क्र.सेनिवे-१००५-१२७/सेवा-४, दिनांक ८/११/२००५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सध्या ज्या अनुदानित संस्था,मंडळे,महामंडळे इत्यादींमधील कर्मचाऱ्यांना राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सध्या लागू असलेली निवृत्तीवेतनाची योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी) सेवा (निवृत्ती वेतन) नियम, १९८२) लागू नाही, अशा संस्थांना यापुढे सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतनाची योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम, १९८२) लागू करण्यात येऊ नये. तसेच यापुढे कोणत्याही अनुदानित संस्था, मंडळे, महामंडळे इत्यादीमधील कर्मचाऱ्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेन) नियम, १९८२) लागू करण्यासंबंधीचे प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येऊ नयेत, असा धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन योजना लागू करण्याबाबत प्रस्ताव अमान्य करण्यात आला आहे.

दरम्यानच्या कालावधीत, सामाजिक न्याय विभागाने त्यांच्या अखत्यारीतील अशासकीय अनुदानित समाज कार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना महाविद्यालयाच्या स्थापनेच्या दिनांकापासून महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ नुसार अनुज्ञेय असलेली सेवानिवृत्ती उपदान योजना, वेतनाच्या महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना, या नियमांतील सर्व तरतुदीसह तसेच यामध्ये वेळोवेळी झालेले बदल व सुधारणासंह व उपदान योजना दिनांक २ सप्टेंबर, १९९९ पासून लागू करण्याचा निर्णय दिनांक २९ ऑक्टोबर, २०१४ च्या शासन निर्णयाद्वारे घेतलेला आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आस्थापनेवरील ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवा दिनांक १/११/२००५ पूर्वी नियमित झालेल्या आहेत, अशा सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती/कुटुंब निवृत्तीवेतन योजना स्वबळावर लागू करण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या विचाराधीन आहे.

मुंबईतील सांताक्रुझ (पश्चिम) पोलिस ठाण्याच्या हद्दीत समाजकंटकांचा वावर वाढल्याबाबत

(१३) १४५९१ (०७-०४-२०१५). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील सांताक्रुझ पश्चिम पोलिस ठाण्याच्या हद्दीतील किशोर कुमार गांगुली मार्गावर समाजकंटकांचा वावर वाढलेला असून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असल्याने माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी पोलिसांमार्फत कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात

येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१५) : (१) हे खरे नाही.

परंतु नमूद रस्त्यावर ग्रामीण भागातून आलेल्या स्थलांतरीत लोकांचा वावर जास्त असून त्यांच्यामुळे स्थानिक रहिवाशांना उपद्रव होत असल्याने स्थानिकांच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

(२) स्थानिक रहिवाशांना उपद्रव देणाऱ्या व्यक्तीवर माहे जानेवारी २०१५ ते अद्यापपर्यंत अंमलीपदार्थ सेवन करणाऱ्या ९ इसमांवर, मुंपोका ११० अन्वये २ महिलांवर, भिक्षेकारी कायदा १९६० अन्वये ४४ इसमांवर, तसेच अमली पदार्थ जवळ बाळगणाऱ्या २ महिलांवर एन.डी.पी.एस. ॲक्ट अन्वये कारवाई करण्यात आलेली आहे.

नमूद मार्गावर पोलीस चौकी निर्माण करुन दिवस/रात्र पोलीस अंमलदारांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

तसेच वेळोवेळी गस्ती वाहनांची परिणामकारक गस्त, पोलीसांची दर्शनीय उपस्थिती ठेवण्यात आलेली असून स्थानिक रहिवाशांना कोणत्याही प्रकारे उपद्रव होणार नाही याची दक्षता घेण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

शासनाने अखिल भारतीय साहित्य संमेलनाप्रमाणे बाल आणि कुमारांच्या साहित्य संमेलनासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(१४) १४६०२ (०७-०४-२०१५). श्री.सुनिल शिंदे (वरळी) : सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अखिल भारतीय साहित्य संमेलनासाठी निधी देणा-या शासनाने मराठीत बाल आणि कुमारांसाठी उत्तम साहित्य प्रसवण्याचे काम करणा-या बाल आणि कुमार साहित्य संमलेनासाठी देखील निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मागणी सातत्याने केली जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बाल आणि कुमार साहित्य संमेलनासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२२-०६-२०१५) : (१) होय.

(२) व (३) महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण, २०१० अंतर्गत "अन्य साहित्य संमेलनांना अनुदान" ही योजना महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत साहित्य संमेलनाच्या आयोजनासाठी अनुदान मंजूर करण्याबाबत महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडे प्राप्त होणारे प्रस्ताव अंतिम निवडीसाठी "मंडळाच्या

सर्वसाधारण बैठकीत मांडले जातात व मंडळाच्या निर्णयानुसार अनुदानासाठी पात्र संस्थांना संमेलनाच्या आयोजनासाठी अनुदान वितरीत केले जाते.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून बालकुमार साहित्य संमेलनाच्या आयोजनासाठी अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था, पुणे या संस्थेस खालीलप्रमाणे निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

सन २०११-१२	रु. २,००,०००/-
सन २०१२-१३	रु. ३,५७,१४०/-
एकूण	रु. ५,५७,१४०/-

दरम्यान महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचा कालावधी संपुष्टात आल्याने व साहित्य संमेलनाना अनुदान देण्यासाठी निकष निश्चित करण्याची कार्यवाही सुरु असल्याने सन २०१४-१५ या कालावधीत बाल कुमार साहित्य संमेलनासाठी निधी उपलब्ध करुन दिलेला नाही. शासन निर्णय क्र. रासांधो १०१२/प्र.क्र.१२६/२०१२/भाषा-३, दि. १७ एप्रिल, २०१५ अन्वये अन्य साहित्य संमेलनांना अनुदान देण्यासाठी निकष निश्चित करण्यात आले आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची पुनर्रचना झाल्यानंतर सदर निकषांच्या आधारे मंडळाकडून अन्य साहित्य संमेलनांना अनुदान देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

बीड जिल्हयात अंगणवाडीच्या इमारती बांधून पूर्ण झाल्याचे दाखवून त्यासंबंधीत देयके मंजूर करण्यात आल्याची बाब

(१५) १४६७४ (०८-०४-२०१५). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) : सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयात मागील दोन-तीन वर्षात ग्रामपंचायतीच्या माध्यमातून अंगणवाडीच्या इमारती बांधून पूर्ण झाल्याचे दाखवून त्यासंबंधीत देयके मंजूर करण्यात आल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे,

(४) चौकशीत दोषी आढळलेल्या व्यक्तीविरुध्द काय कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) अद्याप काहीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्रीमती पंकजा मुंडे (१५-०७-२०१५) : (१) हे खरे नाही.

जिल्हा वार्षिक योजना, मानव विकास कार्यक्रम, १३ वा वित्त आयोग व नाबार्ड या विविध योजनेमधून अंगणवाडी केंद्र इमारत बांधकामे करण्यासाठी जिल्हा परिषदेला निधी प्राप्त होतो. प्राप्त निधीच्या अधिन राहून अंगणवाडी केंद्राचे इमारत बांधकाम करण्यासाठी

अंगणवाडी केंद्राची निवड करुन निधी पंचायत समिती स्तरावर वितरीत केला जातो. सदरील बांधकामे ग्रामपंचायती मार्फत केली जातात. याबाबत जिल्ह्यातील सर्व गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांच्यामार्फत चौकशी केली असता प्रश्नात उपस्थित केलेल्या तक्रारीत तथ्य आढळून आले नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील नागरिकांना स्वस्त दराने घरकुले उपलब्ध करुन देण्याबाबत

(१६) १४७१२ (०७-०४-२०१५). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील नागरिकांना स्वस्त दराने घरकुले उपलब्ध करुन देण्याच्या हेतूने निर्माण केलेली म्हाडाच्या हाऊसिंग स्टॉक योजना रद्द करण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या योजने ऐवजी शासनाने काही पर्यायी योजना आखली आहे, असल्यास, त्याचे स्वरुप काय,

(४) नसल्यास, ही योजना पूर्ववत सुरु ठेवण्याबाबत शासनाची भूमिका काय ?

श्री. प्रकाश मेहता (०२-०७-२०१५) : (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) विकास नियंत्रण नियमावली विनियम ३३ (५) मध्ये सुधारणा करण्याच्या संदर्भात शासनाने दि.४.०५.२०१३च्या अधिसूचनेन्वये सूचना व हरकती मागविल्या होत्या. त्यांचा अभ्यास होऊन शासनाच्या दि. ८.१०.२०१३ च्या अधिसूचनेन्वये सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३(५) अंमलात आलेली आहे.

सदरहू अधिसूचनेतील तरतूदीनुसार म्हाडा वसाहतीलच्या पुनर्विकासाकरिता ३ इतका वाढीव च.क्षे.नि निश्चित करण्यात येऊन त्यातून केवळ बांधकाम केलेल्या सदरनिकांच्या स्वरुपात म्हाडाचा वाटा घेण्याचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. यामुळे पुनर्विकास प्रस्तावात अधिमुल्याऐवजी हाऊसिंग स्टॉक उपलब्ध होत असल्याने अधिकाधिक परवडणाऱ्या घरांच्या संख्येत वाढ होऊन जनतेस घरे उपलब्ध करुन देणे शक्य होईल.

त्यानुसार १८ प्रस्तावांवर देकारपत्राची कार्यवाही झाली असून त्यामधून म्हाडास सुमारे १०८३ सदनिका उपलब्ध होणे अपेक्षित आहे.

शासनाच्या दि. ०८.१०.२०१३ च्या अधिसूचनेन्वये अंमलात आलेल्या सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३ (५) नुसार म्हाडा वसाहतीतील सध्याच्या रहिवाशांना देखील किमान

३००.०० चौ.फुट अधिक ३५% फंजिबल असे एकूण ४०५.०० चौ.फुट (वापरायोग्य) पुनर्वसन क्षेत्र देय केलेले आहे. क्लस्टर डेव्हलपमेंटच्या माध्यमातून म्हाडामार्फत पुनर्विकास केल्यास पुनर्वसन क्षेत्रामध्ये वाढीची तरतूद आहे.

म्हाडा अभिन्यासातील इच्छुक संस्थांनी त्यांच्या इमारतीच्या पुनर्विकासाठी अर्ज केल्यास त्यावर म्हाडामार्फत तातडीने कार्यवाही करण्यात येते.

पवनानगर (ता.मावळ) येथील कृषी अधिकारी कार्यालयात उपस्थित नसल्याबाबत

(१७) १४७२५ (०८-०४-२०१५). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पवनानगर (ता.मावळ) येथील कृषी अधिकारी कार्यालयात उपस्थित नसल्याने येथील ग्रामस्थांनी माहे ५ फेब्रुवारी २०१५ रोजी वा त्यासुमारास कृषी मंडल कार्यालयास टाळे ठोकल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा १६ कर्मचाऱ्यांच्या कार्यालयात एकही कामगार जागेवर नसल्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) चौकशी अंती उक्त प्रकरणी शासनाने संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्याच, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (११-०६-२०१५) : (१) होय.

(२) होय. मंडळ कृषी अधिकारी पवनानगर कार्यालयात ५ अधिकारी/कर्मचाऱ्यांची पदे मंजूर असून ते कार्यकरत आहेत. उक्त घटनेच्या दिवशी सकाळी १०.०० वाजताचे सुमारास मंडळ कृषी अधिकारी व कृषी पर्यवेक्षक कामकाजानिमित्ताने कार्यालयात उपस्थित नव्हते. तर अनुरेखक विलंबाने कार्यालयात उपस्थित राहिले. तथापि, शिपाई स्वत: कार्यालयात उपस्थित होते, असे त्यांनी लेखी जबाबात नमूद केले आहे.

(३) मंडळ कृषी अधिकारी कार्यालयातील तांत्रिक कर्मचारी दररोज पूर्णवेळ नियमित उपस्थित राहून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतील याची अंमलबजावणी सुरु करण्यात आली आहे. तसेच तालुका कृषी अधिकारी वडगाव मावळ यांनी अधिकारी/कर्मचारी यांना यापुढे कार्यालयात नियमित उपस्थित राहण्याबाबत सक्त ताकीद दिली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील ठाणे, पुणे, रत्नागिरी आणि नागपूर अशा चारही ठिकाणच्या मनोरुग्णालयाची पाहणी करण्याचे आदेश

(१८) १४७३१ (०८-०४-२०१५). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ठाणे, पुणे, रत्नागिरी आणि नागपूर अशा चारही ठिकाणच्या मनोरुग्णालयाची पाहणी करण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाचे खंडपीठाने माहे जानेवारी, २०१५ मध्ये आदेश दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा चारही रुग्णालयाची पाहणी करण्यात आली आहे अथवा येत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत (१०-०७-२०१५) : (१) हे खरे आहे. जनहित याचिका क्र. ११/२०१० प्रकरणी मा.न्यायालयाने दिनांक २९/०१/२०१५ रोजी अन्न व औषध प्रशासन व प्रधान जिल्हा न्यायाधीश यांनी त्यांच्या प्रतिनिधींमार्फत चारही प्रादेशिक मनोरुग्णालयाची पाहणी करण्याचे आदेश दिले.

(२) त्यानुसार पाहणी करण्यात आली आहे. सदर पाहणीचा अहवाल न्यायालयास सादर करण्यात आला आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कोडोली (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील बसस्थानकाच्या दर्जोन्नतीबाबत

(१९) १४८१३ (०८-०४-२०१५). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोडोली (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) या बसस्थानकामध्ये प्रतिदिन १०० गाड्यांची आवक व जावक होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोडोली बसस्थानक राष्ट्रीय महामार्ग क्र.२०४ व राष्ट्रीय महामार्ग क्र.४ या महामार्गाना जोडणा-या राज्य मार्गावर स्थित आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रवाशांच्या व कर्मचा-याच्या सोईसाठी या बसस्थानकाला 'आगाराचा दर्जा' देण्याबाबत शासन निर्णय घेणार आहे काय ?

श्री. दिवाकर रावते (१७-०७-२०१५) : (१) व (२) हे खरे आहे.

(३) कोल्हापूर आगाराच्या कार्यक्षेत्रामध्ये कोल्हापूर मध्यवर्ती बसस्थानकापासून ३३.२ कि.मी अंतरावर कोडोली हे गांव आहे. सदरचे गाव वाठार-बोरपाडळे या मार्गावर असून प्रवाशांच्या

सोईसाठी बसस्थानक उभारण्यात आलेले आहे. या बसस्थानकावर ०९.०० ते १७.०० या वेळेत वाहतूक नियंत्रकाची नेमणूक केलेली असून या ठिकाणी विद्यार्थी सवलत पास तसेच आगाऊ आरक्षण व्यवस्था उपलब्ध आहे. या बसस्थानकावर एकूण १४३ फे-या जाता-येत चालनात आहे. कोडोली येथील जवळची आगारे व त्यांची अंतरे, नियते व फेऱ्या तसेच सध्याच्या उपलबध सुविधा पाहता, बसस्थानकाची सुविधा पर्याप्त आहे. कोडोली या बसस्थानकाला आर्थिक दृष्ट्या व्यवहार्य नसल्याने आगाराचा दर्जा देण्याचे सद्यपरिस्थितीत प्रस्तावित नाही.

कोडोली (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील बसस्थानकाची नवीन इमारत बांधण्याबाबत

(२०) १४८१४ (०८-०४-२०१५). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोडोली (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील बसस्थानकाची इमारत ५० वर्षांपूर्वीची आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारत पूर्णपणे नादुरुस्त व धोकादायक बनलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रवाशांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असल्याबाबतच्या तक्रारी महामंडळाकडे प्राप्त झालेल्या आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, नवीन इमारत बांधण्याविषयीच्या प्रस्तावाला तात्काळ मान्यता देऊन आर्थिक तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (२६-०६-२०१५) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) होय.
(४) कोडोली येथील बसस्थानक सन १९६६ साली ७२x२० या मापाचे अे.शी.शीट छप्पर असलेले प्रवाशी निवारा पध्दतीचे बांधण्यात आलेले असून सदर बसस्थानकाची वेळोवेळी दुरुस्ती करण्यात आल्यामुळे ते सुस्थितीत आहे. बसस्थानकावर उपहारगृह, वाहतूक नियत्रंण कक्ष, आरक्षण कक्ष, पार्सल कक्ष इ. सुविधा देण्यात आलेल्या आहेत. रा.प.महामंडळाची आर्थिक स्थिती विचारात घेऊन निधीच्या उपलब्धतेनुसार नवीन इमारतीचे बांधकाम हाती घेण्याबाबत महामंडळ प्रयत्नशील आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

पिशवी (ता.शाहूवाडी जि.कोल्हापूर) येथील एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन योजने अंतर्गत लाभार्थ्यांना बनावट साहित्य वाटप केलेबाबत

(२१) १४८१५ (०८-०४-२०१५). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिशवी (ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर) एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन योजनेमध्ये या गावाचा समावेश आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेच्या माध्यमातून लाभार्थ्यांना क्रॉम्पटन कंपनीचे वाटलेले डिझेल इंजिन बनावट असल्याच्या तक्रारी लाभार्थ्यांनी कृषी विभागाकडे केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित कंपनीचा ठेका शासन बंद करणार आहे काय,
(४) असल्यास, दोषी अधिका-याची चौकशी करून शासन कारवाई करणार आहे काय ?

श्रीमती पंकजा मुंडे (१८-०६-२०१५) : (१) होय. हे खरे आहे. सन २०१३-१४ (Batch-५) मधील iwmp-४२ मध्ये सदर गावाचा समावेश आहे.
(२) हे खरे नाही. अशा कोणत्याही क्रॉम्पटन वा अन्य कंपनीच्या डिझेल इंजिनचा पुरवठा या योजनेतून करण्यात आलेला नाही
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

चंद्रपूर जिल्ह्यातील गोंडपिंपरी तहसीलमधील ग्रामपंचायतीच्या शासकीय योजनांच्या निधीमध्ये झालेला गैरव्यवहार

(२२) १४८२३ (०८-०४-२०१५). ॲड.संजय धोटे (राजूरा) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील गोंडपिंपरी तहसील मधील ग्रामपंचायत मध्ये सन २०११-१२ या वर्षात आर्थिक वर्षात शासकीय फंड सामान्य निधी दलित वस्ती सुधार फंड, पर्यावरण संतुलिक ग्रामसमुध्दी योजना व इतर योजनेमध्ये झालेल्या भ्रष्टाचार संदर्भात दिनांक २२ फेब्रुवारी, २०१४ ला तक्रार दिली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्या चौकशीतून काय आढळून आले व त्या अनुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली वा करीत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्रीमती पंकजा मुंडे (२०-०६-२०१५) : (१) होय हे अंशत: खरे आहे. याबाबतची तक्रार दिनांक २२ फेब्रुवारी, २०१२ रोजी प्राप्त झाली आहे.

(२) याप्रकरणी गट विकास अधिकारी, पंचायत समिती गोंडपिंपरी यांनी चौकशी करुन विशेष लेखा परिक्षणाची मागणी केल्यानुसार विशेष लेखा परिक्षणात रु.७९,७५८/- चा अपहार व ग्रामपंचायतीने केलेल्या कामात अनियमितता आढळून आली आहे. अपहारीत रक्कम रु. ७९,७५८/- संबंधित सचिव श्री.डिएम.शिंदे, श्री.व्हि.बी.भोयर, श्री.एन.पी.निकुरे, ग्रामपंचायत गोंडपिंपरी यांनी भरणा केलेली आहे. त्यामुळे त्यांचेवर विभागीय चौकशी सुरु करण्यात आली असून सदर प्रकरणत सखोल चौकशी करीता दिनांक २३.०६.२०१४ चे आदेशान्वये सहायक आयुक्त (चौ), नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे सुपुर्द करण्यात आले असून याबाबतची सुनावणी दिनांक २९.०६.२०१५ रोजी सहायक आयुक्त (चौकशी), विभागीय आयुक्त कार्यालय नागपुर यांचेकडे ठेवण्यात आली आहे.

तसेच सदर प्रकरणात दोषपात्र सरपंच श्री.सुनिल डोंगरे, ग्रामपंचयात गोंडपिंपरी यांचेवर सुध्दा महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ कलम ३९(१) नुसार अपारत्रतेची कार्यवाही करणेसंदर्भात परिपूर्ण प्रस्ताव विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे दिनांक १०.०७.२०१४ नुसार सादर करण्यात आले असून सदर प्रकरणी लेखी युक्तीवाद दाखल करण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक २७.०५.२०१५ रोजी ठेवण्यात आली आहे.

तसेच संबंधित सचिव व सरपंच यांचेवर अपहार केल्याप्रकरणी पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन गोंडपिंपरी येथे दिनांक १०.०४.२०१५ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती गोंडपिंपरी यांनी तक्रारी नोंदविली असून त्यानुसार सचिव श्री.डि. एम. शिंदे व सरपंच सुनिल डोंगरे, ग्रा.पं. गोंडपिंपरी यांचेवर भा.दं.स. १८६० अन्वये कलम ४०८ व ३४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) विलंब झालेला नाही.

मुंबई शहरात कमर्शियल बसेस या रस्त्याच्या कडेला पार्कींग करत असल्यामुळे अनेक ठिकाणी वाहतुकीची कोंडी होत असल्याबाबत

(२३) १४८३४ (०८-०४-२०१५). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात कमर्शियल बसेस या रस्त्याच्या कडेला पार्कींग करत असल्यामुळे अनेक ठिकाणी वाहतुकीची कोंडी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाहतुकीची कोडी करणा-या कामर्शियल बससेच्या मालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१५) :(१) होय, हे खरे आहे.
(२) सन २०१५ मध्ये मुंबई शहरात रस्त्याच्याकडेला पार्किंग करणाऱ्या ३,५५३ कमर्शिअल बसेसवर मोटार वाहन कायदा कलम १५ (२) (५), आरआरआर १७७ अन्वये कारवाई करण्यात आली आहे. तसेच, डी.एन.नगर वाहतूक विभागांतर्गत मिलटरी रोड, जे.व्ही.पी.डी. ग्राऊंडच्या गेट समोरील रोडवर ३ खाजगी बसेसवर धोकादायक वाहन उभे केल्याबाबत आणि वाहतूकीस अडथळा निर्माण केल्याबाबत जुहू पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ५९/२०१५, मो.वा.का. कलम ३/१८१, ५/१८०, १७९, ३२ आरआरआर/१७७ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

द्रुगधायना (ता.जि.नागपूर) येथील मुस्लिम कबरस्तानाबाबत

(२४) १४८३८ (०७-०४-२०१५). श्री.समिर मेघे (हिंगणा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) द्रुगधायना (ता.जि.नागपूर) येथील मुस्लिम कबरस्तान कमिटीला कब्रस्तान काढण्यासाठी खसरा सर्वे नं. ८८ येथील ४ हेक्टर जागा देणेबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ डिसेंबर, २०१४ वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री व मंत्र्यांना एका निवेदनाद्वारे मागणी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाबाबत शासनाने कार्यवाही केली आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०६-२०१५) : (१) होय.
(२) व (३) शासन स्तरावर प्रस्तावाची छाननी सुरु आहे.

तुरागोंदी (ता.हिंगणा, जि.नागपूर) येथील लघुपाटबंधारे विभाग नागपूर यांच्या अंतर्गत येणा-या धरणाच्या कामाबाबत

(२५) १४८४० (०८-०४-२०१५). श्री.समिर मेघे (हिंगणा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुरागोंदी ता.हिंगणा, जि.नागपूर येथील लघुपाटबंधारे विभाग नागपूर यांच्या अंतर्गत येणा-या धरणाचे काम ७५ टक्के पूर्ण झाले असून सदर बांधकाम त्वरीत करण्यासाठी दिनांक १९ डिसेंबर, २०१४ वा त्या सुमारास लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री यांच्याकडे मागणी केली हे खरे आहे

काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय ?

श्री. गिरीष महाजन (०४-०७-२०१५) : (१) होय,

तुरागोंदी लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या माती धरणाचे काम ८० टक्के पूर्ण झाले.

(२) प्रकल्पाचे धरण पाळ व बुडित क्षेत्रातुन के.व्ही. विद्युत वाहिनी जात असल्याने प्रकल्पाचे उर्वरित काम करणे शक्य झाले नाही. तथापि सद्य:स्थितीत विद्युत वाहिनी स्थलांतरित करण्याचे काम पुर्ण झाले आहे. तसेच प्रकल्पाचा सांडवा व त्यावरील बांधकामाचे सुधारित संकल्पन तयार करण्यात आले असून त्यानुसार काम सुरु करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

डीगडोह (ता.हिंगणा, जि.नागपूर) येथील जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांमध्ये साफसफाई व शिक्षकांची कामे करण्याकरिता शिपायाची नेमणूक न झाल्याबाबत.

(२६) १४८४९ (०८-०४-२०१५). श्री.समिर मेघे (हिंगणा) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डीगडोह, ता.हिंगणा, जि.नागपूर येथील जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांमध्ये साफसफाई व शिक्षकांची कामे करण्याकरिता शिपायाची नेमणूक न झाल्याने सदरहू सर्व कामे ही विद्यार्थ्यांना करावी लागत असून त्याचा विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याचे दि. २० डिसेंबर २०१४ रोजी वा त्या सुमारास उघडकीस आले हे खरे काय ?

(२) असल्यास, मध्यांतर भोजन कामातही विद्यार्थ्यांना मदत करावी लागते हे देखील खरे आहे काय ?

(३) असल्यास, सबंधीतांवर शासनामार्फत कारवाई करण्यात आली आहे काय ?

(४) नसल्यास, विलंबनाची सर्वसाधारण कारणे काय ?

श्रीमती पंकजा मुंडे (२०-०६-२०१५) : (१) (२), (३) व (४) सदर शाळेत पटसंख्येच्या निकषानुसार त्या शाळेत शिपाई (परिचर) कार्यरत नाही. मध्यान्ह योजनेतील कामे खिचडी शिजवणारी महिला करते. तसेच सर्व शाळेचे मुख्याध्यापक व केंद्र प्रमुख यांना विद्यार्थ्यांकडून कोणतीही कामे करवून न घेण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

हिंगणा (जि.नागपूर) येथील गावांमध्ये बससेवा उपलब्ध नसल्याबाबत

(२७) १४८५० (०८-०४-२०१५). श्री.समिर मेघे (हिंगणा) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ता.हिंगणा, जि.नागपूर येथील पिंपळधारा, लखमापूर, मांडवा, धानोली, कांन्होली, गुणगांव, माथनी, कोकोर्डी , सुकळी, डेंगमा, संगम, इटेवाही, खेरी व कटकधाना या गावांमध्ये अजुनही बससेवा उपलब्ध नसल्याची बाब दिनांक २२ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू गावांमध्ये बससेवा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. दिवाकर रावते (०७-०७-२०१५) : (१) हे खरे आहे.

(२) पिंपळधारा, लखमापूर, मांडवा, धानोली, कान्होली, गुणगांव, माथनी, कोकोर्डी, सुकळी, डेंगमा, संगम, इटेवाही, खेरी व काटकधाणा ही गांवे मुख्य रस्त्यापासून १ ते ४ कि.मी. अंतरावरील आहेत. तसेच प्रवासी वाहतूकीस रस्ता योग्य नसल्यामुळे थेट रा.प. वाहतूक नाही.

सदरहू गावांमधील रस्त्यांची तपासणी करण्यात आलेली असून रस्ता दुरुस्त करणेबाबत राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावरुन संबंधितांना कळविण्यात आले असन रस्ता वाहतूकीयोग्य झाल्यानंतर तपासणी करुन राज्य परिवहन वाहतूकीबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

बोखारा, (जि.नागपूर) येथील पेयजेल योजना कार्यान्वित करण्याबाबत

(२८) १४८५१ (०७-०४-२०१५). श्री.समिर मेघे (हिंगणा) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोखारा, (जि.नागपूर) येथे नव्याने निर्माण झालेल्या वस्तीकरिता बोखारा ग्रामपंचायत अंतर्गत रूपये २.५४ कोटीची पेयजल योजना मंजूर झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पेयजल योजनेचे काम हे ६ महिन्यापूर्वी पूर्ण झालेले असून पाणी उपलब्ध न झाल्याने ही योजना अयशस्वी ठरल्याचे दिनांक १६ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू योजना पूर्णत्वास नेण्याकरिता शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबांची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

श्री. बबनराव लोणीकर (३०-०६-२०१५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर योजना महाराष्ट्र राज्य विज निर्मिती कंपनी (महाजेनको) प्रकल्पाबाधीत असल्याने त्यांचे तर्फे योजना मंजूर करुन राबविण्यात आली. तथापि, अस्तित्वातील स्त्रोताचे पाणी नविन वस्तीला अपुरे पडल्याने योजना अयशस्वी ठरली.
(३) मौजे बोखारा या गावाचा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेच्या सन २०१५-१६ च्या कृती आराखडयात समावेश करण्यात आला आहे. सदर गांव नागपूर जिल्हयातील निमशहरी क्षेत्रात समाविष्ट असल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा तर्फे सन २०१५-१६ व सन २०१६-१७ पर्यंत वाढीव योजना पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

वाना डोंगरी, ता.हिंगणा, जि. नागपूर येथे प्रवाशांकरिता नविन बसवाहन उपलब्ध करुन देण्याबाबत

(२९) १४८५२ (०८-०३-२०१५). श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाना डोंगरी, (ता.हिंगणा, जि. नागपूर) येथील प्रवासी हे एस.टी. महामंडळाने आकारलेल्या तिकीटाप्रमाणे भाडे देत असतांना नादुरुस्त व जुन्या एस.टी. गाडयांमधून प्रवास करतांना घाटामध्ये उतरुन बसला धक्का मारावा लागल्याची धक्कादायक बाब दि. २३ जानेवारी, २०१५ वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय ?
(२) असल्यास, सदर भागामध्ये नविन एस.टी. देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय ?

श्री. दिवाकर रावते (१४-०७-२०१५) :(१) हे खरे नाही.
(२) नागपूर विभागातील बसेसची यांत्रिक तपासणी नियमितपणे केली जाते व कोणतेही नादुरुस्त वाहन मार्गावर दिले जात नाही.

नागपूर विभागात सन २०१२-१३ मध्ये ६२, सन २०१३-१४मध्ये ६३, सन २०१४-१५ मध्ये १९ अशी एकूण १४४ नविन वाहने दिली आहेत व याच कालावधीत एकूण १३३ जुन्या बसेस मोडीत काढल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

दिग्रस बुद्रूक (जि.बुलढाणा) येथील पेयजल योजनेचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

(३०) १४८६४ (०७-०४-२०१५). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिग्रस ब्रुद्रूक (जि.बुलढाणा) येथील पेयजल योजनेच्या कामाचे भूमिपूजन सन २०१२ मध्ये होऊन अद्यापी ह्या योजनेचे काम अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर योजनेचे काम त्वरित पूर्ण करुन पाणीपुरवठा सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (३०-०६-२०१५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) उद्भवाच्या जागेबाबत समिती व ग्रामपंचायत मध्ये वाद झाल्याने उद्भवाच्या जागेत बदल झाला त्यामुळे कामास विलंब झाला आहे.

(३) ग्रामिण पाणी पुरवठा समितीला काम पूर्ण करण्याबाबत निर्देश दिले असून काम प्रगतीत आहे. नोव्हेंबर २०१५ पर्यंत काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मेरा खुर्द व गुजाळा (जि.बुलढाणा) गावातील अंगणवाड्या समाज मंदिरामध्ये भरविण्यात येत असल्याबाबत

(३१) १४८६५ (०८-०४-२०१५). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) : सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेरा खुर्द व गुंजाळा (जि.बुलढाणा) गावातील ४ अंगणवाड्याच्या इमारती बांधलेल्या असल्या तरी सदर अंगणवाड्या समाज मंदिरामध्ये भरविण्यात येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अंगणवाड्या समाजमंदिरात भरण्याची कारणे काय आहेत,

(३) सदर अंगणवाड्या अंगणवाड्याच्या इमारतीमध्ये केव्हा भरविण्यात येणार आहेत?

श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१५) : (१) अंशतः खरे आहे.

मौजे मेरा खुर्दा, ता.चिखली येथे ५ अंगणवाडी केंद्र असून त्यापैकी अंगणवाडी केंद्र क्र. १,४,५ समाज मंदिरामध्ये भरत आहे. अंगणवाडी केंद्र क्र. 2 व 3 हे ग्रामपंचायतीच्या जागेमध्ये भरत आहे. यापैकी सन २०१४-१५ मध्ये अंगणवाडी केंद्र क्र.१ साठी इमारत बांधकाम मंजूर झालेले असून त्याचे काम सुरु झालेले आहे. मौजे गुंजाळा येथे २ अंगणवाडी केंद्र असून १ अंगणवाडी केंद्र अंगणवाडीच्या इमारतीमध्ये भरते. अंगणवाडी केंद्र क्र. २ साठी इमारत नसल्याने समाजमंदिरामध्ये भरते.

(२) अंगणवाडीसाठी इमारत नसल्यामुळे सदर अंगणवाडयासाठी पर्यायी व्यवस्था म्हणून समाजमंदिरामध्ये भरविण्यता येतात.
(३) मौजे मेरा खुर्द येथील १ अंगणवाडी इमारतीचे बांधकाम सुरु असून बांधकाम पूर्ण झाल्यानंतर अंगणवाडीमध्ये भरतील व टप्याटप्याने अंगणवाडी इमारत बांधकामासाठी निधी प्राप्त झाल्यानंतर मेरा खुर्द येथील ४ व मौजे गुंजाळा येथील १ केंद्रासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

पुणे शहरातील कचरा पुरंदर तालुक्यात टाकण्यास ग्रामस्थांनी विरोध केल्याबाबत

(३२) १४८८४ (०८-०४-२०१५). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील गोळा झालेला कचरा कंत्राटदारांनी पुणे जिल्हयातील पुरंदर तालुक्यात टाकण्यासाठी नेत असताना तेथील ग्रामस्थांनी यास विरोध केल्याची बाब दिनांक ६ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीअंती त्यात काय आढळून आले व तदनुसार पुढे कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०७-२०१५) : (१) होय.
(२) दिनांक १.१.२०१५ पासून पुणे महानगरपालिका प्रशासनाकडून अधिक व्यापक प्रमाणावर कचऱ्याचे ओला व सुका कचरा असे वर्गीकरण करण्यात येत आहे. सदर कचरा पुणे जिल्हयालगतच्या गावांमधील शेतकऱ्यांच्या मागणीनुसार त्यांचे शेतात सेंद्रिय खत करण्यासाठी देणेत येत आहे.

दिनांक १.१.२०१५ ते दिनांक ३०.४.२०१५ अखेर पुणे शहरातील सुमारे ४३०७७ मे. टन वर्गीकृत ओला कचरा शेतकऱ्यांच्या शेतात खतनिर्मितीसाठी देण्यात आला.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे जिल्हयातील जुन्नर तालुक्यातील कांदा पिकाचे नुकसान झाल्याबाबत

(३३) १४८९५ (०८-०३-२०१५). श्री.अजित पवार (बारामती), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील जुन्नर तालुक्यातील कांदा उत्पादक शेतक-यांनी चढया भावाने बियाणे घेऊन व औषधांची फवारणी करून कांदा पिकाचे उत्पादन घेत असतांना कांदा पिकाला डेंगळा

रोगाचा माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये प्रादुर्भाव झाल्याने शेतक-यांच्या पिकाचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नुकसानग्रस्त लागवड क्षेत्राचे पंचनामे करून नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी शेतक-यांकडून संबंधित यंत्रणेकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नुकसानग्रस्त शेतक-यांना मदत मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. एकनाथराव खडसे (१०-०७-२०१५) : (१) कांदा पिकास अंशत: डेंगळे आले आहेत हे खरे आहे.

(२) शेतक-यांकडून मागणी करण्यात आलेली नाही. त्यामुळे नुकसानीचे पंचनामे करण्यात आलेले नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे जिल्हा परिषदेत सेवेत असताना अकाली निधन झालेल्या कर्मचा-यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर नोकरी देण्याबाबत

(३४) १४९३३ (०८-०४-२०१५). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा परिषदेत सेवेत असताना अकाली निधन झालेल्या कर्मचा-यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर नोकरी देण्याचे १७२ प्रस्ताव प्रलंबित असल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी करुन या प्रस्तावावर काय कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (२०-०६-२०१५) : (१) हे खरे आहे.

(२) व (३), दिनांक २६/०१/२०१४ रोजी प्रसिध्द केलेल्या अनुकंपा ज्येष्ठता प्रतिक्षायादीतील ठाणे जिल्ह्यातील १७२ प्रस्तावांपैकी सन २०१३ मध्ये १४ व सन २०१४ मध्ये ४६ अशा एकूण ६० उमेदवारांना नियमांनुसार उपलब्ध जागांवर नियुक्त्या देण्यात आलेल्या आहेत.

या व्यतिरिक्त जून २०१४ नंतर आज अखेर अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसाठी ७२ अपूर्ण स्वरुपातील प्रस्ताव प्राप्त झालेले असून याबाबतच्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन हे प्रस्ताव नियमित सेवाज्येष्ठता यादीत समाविष्ट करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येत आहे.

शासन नियमानुसार सरळसेवेच्या पदावर अनुकंपा ज्येष्ठतासूचीतील क्रमवारीनुसार उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबतची कार्यवाही पद उपलब्धतेनुसार करण्यात येत आहे.

कल्याण (जि.ठाणे) शहाड आणि आंबिवली रेल्वे स्थानकादरम्यान मोहने रेल्वे फाटकाजवळील उड्डाणपूलाचे काम प्रलंबित असल्याबाबत

(३५) १४९३७ (०७-०४-२०१५). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) शहाड आणि आंबिवली रेल्वे स्थानकादरम्यान मोहने रेल्वे फाटकाजवळ मागील चार वर्षापासून काम सुरु असलेला उड्डाणपूल दोन्ही बाजूंच्या संलग्न रस्त्यांसाठी जमीन नसल्याने रखडला असल्याची माहिती माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर उड्डाणपुलाचे काम पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०७-२०१५) : (१) हे अंशत: खरे आहे,

माहे जानेवारी २०१५ मध्ये मौजे वडवली येथील जागेत श्री.प्रविण गड्डा यांनी या उड्डाणपुलाचे काम करण्यास हरकत घेतली आहे.

(२) व (३) शहाड आंबिवली स्थानकादरम्यान लेव्हल क्रॉसिंग गेट क्र.४७ बी येथील मोहने वडवली येथील प्रस्तावित रेल्वे उड्डाणपुलाचे काम मध्य रेल्वेच्या सहकार्याने खर्च विभागणी तत्वावर हाती घेण्यात आले आहे. माहे जानेवारी २०१५ मध्ये मौजे वडवली सर्व्हे नं.३२/८ अ येथील जागेत श्री.प्रविण गड्डा यांनी पुलाचे काम करण्यास पूर्वी दिलेली सहमती मागे घेऊन हरकत घेतली आहे. त्यामुळे एकूण ५० मीटर लांबीच्या परिसरातील पाईल फाऊंडेशनचे काम सद्यस्थितीत थांबविण्यात आले आहे. सदर उड्डाणपुलाचे काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेली जमीन हस्तांतरणीय विकास हक्काच्या माध्यमातून (टी.डी.आर.) व आवश्यकता भासल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२६ नुसार कार्यवाही करुन भुसंपादनातील अडचणी दूर करण्याबाबत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

बदलापूर (पूर्व) जि.ठाणे येथे राज्य परिवहन महामंडळाचा एस.टी.डेपो सुरु करण्याचे प्रस्तावित केल्याबाबत

(३६) १४९४० (०८-०४-२०१५). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर (पूर्व) जि.ठाणे येथे राज्य परिवहन महामंडळाचा एस.टी.डेपो सुरु करण्याचे प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त एस.टी. डेपोच्या बांधकामास सुरुवात करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, सदरहू बांधकाम केव्हापर्यंत पूर्ण करणे अपेक्षित आहे,

(४) सदरहू एस.टी. डेपो लवकरात लवकर कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिवाकर रावते (२६-०६-२०१५) :(१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) रा.प.महामंडळाचे बदलापूर येथे सन १९९०-९१ साली ७५ फुट x २३ फुट आकाराचे ३ फलाटांचे मिनीबसस्थानकाचे बांधकाम पूर्ण करुन वापरात आणले आहे. येथून जाणाऱ्या व येणाऱ्या ८६ फेऱ्या चालनात आहेत. तसेच बसस्थानकावर प्रवासी प्रतिक्षालय, स्त्री/पुरुष स्वतंत्र प्रसाधगृह, चालक/वाहक विश्रांतीगृह, वाहतूक नियंत्रण कक्ष, विद्यार्थ्यांकरीता पास वितरीत करण्यासाठी स्वतंत्र खिडकी, इत्यादी सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. वाहनतळाचे डांबरीकरण केलेले आहे. बसस्थानकावर उपलब्ध सुविधा पुरेशा आहेत. आर्थिक व्यवहार्यता नसल्याने बदलापूर येथे नविन आगार प्रस्तावित नाही.

(५) प्रश्न उदभवत नाही.

मुंबई राज्याच्या विविध ठिकाणी सुरु असलेले खाजगी झटपट लॉटरी केंद्रे बंद करण्याबाबत

(३७) १४९५८ (०८-०४-२०१५). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यात विविध ठिकाणी सुरभी भिमा, गोल्ड मिनी मुंबई लक्ष्मी अशा विविध नावाने मोठ्या प्रमाणावर खासगी लॉटरी केंद्रे सुरु असल्यामुळे शासनाचा मोठा महसुल बुडत असून अनेक नागरिकांचे या झटपट लॉटरीमुळे संसार उध्वस्त झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या वा त्या सुमारास उघडकीस आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई राज्याच्या विविध ठिकाणी सुरु असलेले खाजगी झटपट लॉटरी केंद्रे बंद करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०७-२०१५) : (१) व (२) हे खरे नाही. तथापि, पोलीस आयुक्त, मुंबई शहर यांच्या कार्यक्षेत्रातील माहे जानेवारी ते एप्रिल, २०१५ अखेर एकूण १५ झटपट लॉटरी केंद्रावर कारवाई करण्यात आली असून, त्यामध्ये ३३ आरोपींना अटक करण्यात आली असून रु.७३,३८०/- चा माल जप्त करण्यात आला आहे.

याव्यतिरिक्त राज्यात बीड जिल्ह्यातील गेवराई पोलीस ठाणे हद्दीत दि.२७/०३/२०१५ रोजी विनापरवाना बेकायदेशीररित्या झटपट लॉटरी केंद्र चालू असल्याचे आढळून आल्याने त्यांच्याविरुध्द गेवराई पोलीस ठाणे येथे गु.र.नं.३०३७/२०१५ मुंबई लॉटरी आणि बक्षिस अधिनियम १९५८ मधील कलम ४ (१) (अ) (ब) (अ) (ड) (ग) (ह) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्यात एकूण ४ व्यक्तींना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून रु.१,१३,२००/- चा माल जप्त करण्यात आलेला आहे. राज्याच्या इतर भागात अशा प्रकारच्या घटना आढळून आलेल्या नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे जिल्ह्यातील भाटघर व वीर प्रकल्पातील नागरी सुविधांबाबत

(३८) १४९८९ (०८-०४-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील भाटघर व वीर प्रकल्पातील नागरी सुविधांसाठी अनुक्रमे रु. १२९ लक्ष व रु. ५१ लक्ष असे एकूण रु. १८० कोटींचा नागरी सुविधा मिळणेबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाकडे प्रलंबित असून त्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. पुनर्वसन मंत्री यांना दिनांक ३१ जानेवारी, २०१५ रोजी निवेदन दिले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी यावर शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१६-०६-२०१५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) पुणे जिल्ह्यातील भाटघर व वीर प्रकल्पातील नागरी सुविधांसाठी अनुक्रमे रु.१२९ कोटी व रु.५१ कोटी असे एकूण रु.१८० कोटींचा नागरी सुविधा मिळणेबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावासंदर्भात सन १९७६ पूर्वीच्या प्रकल्पातील पुनर्वसित गावांतील नागरी सुविधा पुरविणे या योजनेंतर्गत अशाप्रकारचे अन्य प्रकल्पातील प्रस्ताव एकत्रितरीत्या सादर करण्याबाबत तसेच तत्संबधित वित्तीय नियोजन करुन त्यास नियोजन विभागाची मान्यता घेण्याबाबत वित्त विभागाने दिलेल्या निर्देशांनुसार, सदर योजनेंतर्गत वित्तीय नियोजन प्रस्ताव नियोजन विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता.

तथापि, सदर वित्तीय नियोजन उपलब्ध नियतव्ययानुसार नसल्यामुळे मान्य करता येणार नाही, असे अभिप्राय नियोजन विभागाने दिले होते. तद्नंतर, मुख्य सचिव यांच्या दि.११/०४/२०१४ च्या अर्ध शासकीय पत्रान्वये सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्याकडील योजनांतर्गत योजनांचे प्रस्ताव नियोजन विभागाच्या मूल्यमापन समितीसमोर सादर

करण्याबाबत सूचित करण्यात आले होते. तदनुसार सदर योजनचे पुनर्वसन विभागाकडून आढावा घेऊन सदर योजनेच्या मूल्यमापनाचा प्रस्ताव मूल्यमापन समितीच्या शिफारशीसाठी/मान्यतेसाठी नियोजन विभागास सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावावरील मूल्यमापन समितीच्या मान्यतेनुसार/निर्णयानुसार/शिफारशीनुसार पुनर्वसन विभागाकडून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

खाजगी संस्थाचालकांनी अन्याय केलेल्या २२ विद्यार्थ्यांना प्रत्येकी २० लाख रुपये नुकसान भरपाई शासनाला द्यावी लागल्याबाबत

(३९) १४९९५ (०९-०४-२०१५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुणवत्ता डावलून तीन वर्षापूर्वी वैद्यकीय प्रवेश देणा-या खाजगी शिक्षण संस्थांवर कोणतीच कारवाई करण्यात न आल्याने खाजगी संस्थाचालकांनी अन्याय केलेल्या २२ विद्यार्थ्यांना प्रत्येकी २० लाख रुपये नुकसान भरपाई शासनाला द्यावी लागणार असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने उक्त संस्थांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१५-०६-२०१५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील ९० साखर कारखान्यांकडे असलेल्या थकबाकीच्या वसुलीसाठी आयकर विभागाने नोटीसा पाठविल्याबाबत

(४०) १४९९७ (१०-०४-२०१५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ९० साखर कारखान्यांकडे ५ हजार ४०० कोटींच्या थकबाकीच्या वसुलीसाठी आयकर विभागाने राज्यातील सर्व सहकारी साखर कारखान्यांना माहे फेब्रुवारी २०१५ मध्ये नोटिसा पाठविल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या राज्यातील सर्व सहकारी कारखाने साखरेचे बाजार घसरल्याने अत्यंत अडचणीच्या काळातून चालेले असून साखर कारखाने बंद पडण्याच्या मार्गात आहेत, हेही खरे

आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. चंद्रकांत पाटील (०८-०७-२०१५) : (१) अंशतः खरे आहे.

राज्यातील ७५ साखर कारखान्यांकडे रु. २४६९ कोटीच्या आयकर थकबाकीसाठी आयकर विभागाने माहे मे, २०१५ मध्ये नोटीसा पाठविलेल्या आहेत.
(२) होय.
(३) राज्यातील साखर कारखान्यांना सन २०१४-१५ मध्ये ऊस उत्पादकांना FRP प्रमाणे ऊस दर अदा करण्यासाठी असणा-या अडीअडचणीवर विविध उपाययोजना करणेसाठी शासन स्तरावरुन प्रयत्न सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

गर्भवती स्त्रीयांच्या प्रसुती दरम्यान होणाऱ्या मृत्यूच्या प्रमाणात झालेली वाढ

(४१) १५०११ (०८-०४-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पोषण आहाराचा अभाव, वैद्यकीय तपासणी न होणे, रक्तदाब वाढणे किंवा आवश्यक रक्तगट न मिळणे इ.विविध कारणामुळे सन २०१४ यावर्षी मुंबईतील २७६ तर राज्यातील १३९० गर्भवती स्त्रियांचा प्रसुती दरम्यान मृत्यू झाल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शसनाने अधिक चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार प्रसुती दरम्यान मृत्यूमुखी पडणाऱ्या स्त्रीयांचा मृत्यू होऊ नये म्हणून कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

डॉ. दीपक सावंत (०९-०७-२०१५) : (१) होय, हे अंशत: खरे आहे.

माहे एप्रिल, २०१३ ते मार्च, २०१४ या कालावधीत राज्यामध्ये विविध वैद्यकिय कारणांमुळे व आजारांमुळे १३९० मातामृत्यू झालेले आहेत, त्यापैकी बृहन्मुंबईमध्ये २७४ मातामृत्यू झालेले आहेत.
(२) व (३) जिल्हास्तरावर जिल्हा शल्यचिकित्सक व महानगरपालिका स्तरावर वैद्यकिय आरोग्य अधिकारी महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या मातामृत्यू गुणवत्ता अभिवचन समितीच्या सभांमध्ये मातामृत्यूच्या कारणाचे अन्वेषण करण्यात आले. यामध्ये योनीमार्गांतून अतिरक्तस्त्राव, उच्च रक्तदाब, जंतुदोष अशा विविध आजारांचा प्रार्दूभाव

होऊन मातामृत्यू झालेले आहेत. मातामृत्यू कमी करण्याकरिता शासनामार्फत विविध योजना राबविल्या जात आहेत. यामध्ये गरोदर मातांना लोहयुक्त गोळ्या, धर्नुवाद लस, गरोदरपणातील तपासण्या तसेच मोफत वाहतुक सुविधा, प्रसुती व सिझेरियन सेक्शन, मोफत आहार, मोफत प्रयोगशाळा तपासणी आणि मोफत औषधोपचार अशा उपाय योजना करण्यात येतात.

अतिवृष्टीमुळे बुलढाणा जिल्ह्यातील खामगांव वगळता उर्वरित १२ तालुक्यातील शेत जमिनीतील विहिरीबाबत

(४२) १५०३८ (०८-०४-२०१५). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१३ मधील अभूतपूर्व अतिवृष्टीमुळे बुलढाणा जिल्ह्यातील खामगांव वगळता उर्वरित १२ तालुक्यातील शेत जमिनीतील खामगांव वगळता उर्वरित १२ तालुक्यातील शेत जमिनीतील तब्बल ८६९ विहिर होत्याच्या नव्हत्या होऊन यापैकी ७६४ विहिरी खचल्या व १०५ विहिरी बुडाल्या तसेच एकटया लोणार तालुक्यातील ५९० विहिरी खचल्या आणि ६ बुजल्याचे तेव्हा करण्यात आलेल्या सर्व्हेक्षणात आढळून आले होते हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या विहिरीचे दुरुस्तीचे काम मनरेगा (रोहयो) च्या माध्यमातून करण्याची परवानगी दिनांक २३ मे, २०१४ च्या शासन निर्णयाद्वारे दिली आहेत हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या विहिरी अद्यापही दुरुस्तीविना पडून आहेत हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

श्रीमती पंकजा मुंडे (०८-०७-२०१५) :(१) व (२) हे खरे आहे.

बुलढाणा जिल्ह्यात सन २०१३ मध्ये अतिवृष्टीमुळे ७६४ व बुजल्यामुळे १०५ अशा एकूण ८६९ विहिरी बाधित आहेत. महात्मा गांधी नरेगाअंतर्गत खचलेल्या व बुजलेल्या विहिरींच्या दुरुस्तीची कामे दिनांक २३ मे, २०१४ अन्वये घेण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर कामे दिनांक ३१ डिसेंबर, २०१४ पर्यंत पुर्ण करण्याच्या सुचना देण्यात आल्या होत्या. तथापि, शसन परिपत्रक दिनांक ५ जानेवारी, २०१५ नुसार सदर कामास दिनांक ३१ मे, २०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.
(३) हे खरे नाही.

बुलढाणा जिल्ह्यातील ७६४ खचलेल्या विहिरीपैकी ६४० विहिरींना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून १२ विहिरी पुर्ण झाल्या आहेत. उर्वरित विहिरींची कामे सुरु असून दिनांक ३१ मे, २०१५ पर्यंत पुर्ण करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

लोणार सरोवरचा विकास, देखभाल व समस्या दूर करण्यासाठी बुलढाणा जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याबाबत.

(४३) १५०४८ (०७-०४-२०१५). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जगप्रसिध्द लोणार सरोवरचा विकास, देखभाल व समस्या दूर करण्यासाठी बुलढाणा जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली १० सदस्यीय समिती स्थापन करण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिनांक १५ जानेवारी, २०१५ रोजी शासनास दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी शासनाने समिती नियुक्त केली आहे काय, असल्यास, समितीमध्ये कोणकोणते सदस्य आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०७-२०१५) :(१) होय.

(२) जिल्हाधिकारी यांच्या दिनांक १९/१/२०१५ च्या आदेशान्वये खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी, बुलडाणा - अध्यक्ष
उपवनसंरक्षक, बुलडाणा.
अधिक्षक, भारतीय पुरातत्व विभाग, औरंगाबद.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई यांनी नामनिर्देशित केलेली प्रतिनिधी.
उपविभागीय अधिकारी, मेहकर.
तहसिलदार, लोणार.
मुख्याधिकारी, नगर परिषद लोणार. **अशासकीय सदस्य**
श्री.सी.स.कप्तान, वरिष्ठ वकील, मा.उच्च न्यायलय खंडपिठ, नागपूर.
श्री.एन.बी.काळवाघ, वकील, मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपिठ.
श्री.सुधारक त्र्यंबक बुगदाने, अध्यक्ष, लोणार सरोवर मित्र मंडळ.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

बुलढाणा जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडून आदिवासी शेतक-यांना विशेष घटक योजनेअंतर्गत अनुदानाची रक्कम देण्यात आली नसल्याबाबत

(४४) १५०६२ (०९-०४-२०१५). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडून संग्रामपूर तालुक्यातील १४ आदिवासी

शेतक-यांना शासनाचे नियम व निकष धाब्यावर बसवून विशेष घटक योजनेअंतर्गत अनुदानाची रक्कम देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे संबंधितावर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (३०-०६-२०१५) : (१) (२) व (३) हे खरे नाही. आदिवासी शेतकऱ्यांना विशेष घटक योजनेतंर्गत लाभ देण्यात येत नसून, आदिवासी उपयोजना (क्षेत्रातंर्गत /क्षेत्राबाहेरील) योजनेतंर्गत लाभ देण्यात येतो.

बुलढाणा जिल्हयातील संग्रामपूर तालुक्यात सन २०१४-१५ मध्ये अर्ज केलेल्या २६ अर्जदारांपैकी ४ अर्जदारांना योजनेचा लाभ देण्यात आला. उर्वरित २२ अर्जदारांपैकी १० अर्जदारांच्या कुटुंबांतील व्यक्तीनी यापुर्वीच योजनेचा लाभ घेतला होता, त्यामुळे त्यांना लाभ देण्यात आला नाही, उर्वरित १२ अर्जदारांपैकी, ७ अर्जदार आदिवासी उपयोजना (क्षेत्रातंर्गत) क्षेत्रातील होते. बुलढाणा जिल्हयासाठी सदर योजना आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील (ओटीएसपी) लाभार्थ्यांसाठी राबबावयाची आहे. आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील निधी क्षेत्रातंर्गत लाभार्थ्यांसाठी वापरता येत नाही. २ अर्जदारांकडे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र नव्हते, तर ३ अर्जदारांचे उत्पन्न योजनेच्या विहित मर्यादेत नव्हते. त्यामुळे या सर्व अर्जदारांना योजनेचा लाभ देता आला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे येथील कापूरबावडी परिसरात बंदी घातलेल्या औषधांची विक्री करणाऱ्या व्यक्तींना अंमली पदार्थ विरोधी पथकाने अटक केल्याबाबत

(४५) १५०८६ (०८-०४-२०१५). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील कापूरबावडी परिसरात बंदी घातलेल्या कंपन्यांच्या झोपेच्या गोळया व कफ सिरपची विक्री करणाऱ्या व्यक्तींना अंमली पदार्थ विरोधी पथकाने अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारण काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) ठाणे पोलीस आयुक्त परिसरातील कापुरबावडी पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं ३०१२/१५ दि.०५.०२.२०१५ रोजी २२.३० वाजता औषधे व सौदर्य प्रसाधने कायदा १८ (क), १८ (अ), २७

बी, २८, २६ ए, २८ बी अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्यातील ४ आरोपींना दि.५.२.२०१५ रोजी अटक करण्यात आली असून त्यांचेवर दि.३०.३.२०१५ रोजी मा.न्यायालयात दोषारोप पत्र पाठविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मेळघाट (जिल्हा अमरावती) येथील सौर दिवे गैरव्यवहाराबाबत

(४६) १५११८ (०८-०४-२०१५). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील मेळघाटातील अनेक ग्रामपंचायतीमध्ये निकृष्ट दर्जाचे सोलर लावून लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याची बाब आहे डिसेंबर वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय ?
(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय ?
(३) या चौकशीत काय आढळून आले आहे व दोषी विरुध्द काय कारवाई करण्यात आली आहे वा करण्याचे योजिले आहे ?
(४) नसल्यास, याबाबत होणा-या विलंबाची कारणे काय ?

श्रीमती पंकजा मुंडे (२३-०६-२०१५) :(१) नाही. चौकशी अंती सदर सौरदिवे हे दरकरारात नमूद दर्जाप्रमाणे आहेत. तथापि, दरकरारावर न घेता दरपत्रक मागवून खरेदी केल्यामुळे वित्तीय अनियमितता झाली आहे.
(२) होय.
(३) सदर प्रकरणी चौकशी अंती दोषी ग्रामसेवक यांचेकडून सोलर खरेदी करण्यात आलेली प्रत्यक्ष रक्कम व आर.सी.चे दर या मधील तफावत रक्कमेचा भरणा दोषी सरपंच/ग्रामसेवकाकडून रुपये २,१३,९५६/- वसूल करण्यात आले असून, शासन खाती जमा करण्यात आले आहेत. तसेच दोषी ग्राम सेवकांच्या दोन वार्षिक वेतनवाढी थांबविण्यात आलेल्या असून दोषी सरपंच यांना महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियम, १९५८ मधील कलम ३९ नुसारच्या कार्यवाहीबाबत नोटीस देण्यात आली.
(४) विलंब झालेला नाही.

नांदगाव पेठ (जि.अमरावती) येथील औष्णिक विज प्रकल्पाची चिमणी (धुरांडे) कमी उंचीची असल्याने नागरिकांचे आरोग्यास हानी होत असल्याबाबत

(४७) १५१२२ (०६-०४-२०१५). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदगाव पेठ(जि.अमरावती) येथील औष्णिक वीज प्रकल्पाची चिमणी (धुरांडे) ची उंची

कमी असल्याने याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण बोर्डाद्वारे चौकशी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चिमणी (धुरांडे) ची उंची कमी असल्याने नागरिकांच्या आरोग्यास हानी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुषंगाने सदर प्रकल्पावर कोणती दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. रामदास कदम (१४-०७-२०१५) : (१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अमरावतीद्वारे दिनांक २२.१.२०१५ रोजी सदर उद्योगाच्या चिमणीची (धुरांडे) ऊंची टोटल डीजीटल स्टेशन यंत्रणाद्वारे मोजण्यात आली असता सदरील चिमणीची उंची ही २७५ मीटर एवढी असल्याचे आढळून आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोकणातील फळ पिक विमा योजनेंतर्गत काजू पिकासाठी असणारा विमा संरक्षण कालावधी चुकीचा असल्याबाबत

(४८) १५१४० (०८-०४-२०१५). श्री.नितेश राणे (कणकवली) : सन्माननीय **कृषी (फलोत्पादन) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणातील फळ पिक विमा योजनेंतर्गत काजू पिकासाठी असणारा विमा संरक्षण कालावधी चुकीचा असून या कालावधीत बदल करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी मा. कृषी मंत्री यांचेकडे माहे नोव्हेंबर, २०१४ च्या शेवटच्या आठवडयात वा त्या सुमारास केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास प्रश्न भाग (१) मधील निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०८-०६-२०१५) : (१) हे, खरे नाही. अशा प्रकारचे मागणी/निवेदन दिसून येत नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

वडगाव मावळ (जि.पुणे) येथील जुना पुणे-मुंबई महामार्गालगत जैव वैद्यकीय अवशेष व कचरा मोठ्या प्रमाणावर टाकण्यात येत असल्याबाबत

(४९) १५१४७ (०६-०४-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडगाव मावळ (जि.पुणे) येथील जुन्या पुणे-मुंबई महामार्गालगत मोठया प्रमाणावर जैव वैद्यकीय अवशेष व कचरा मोठ्या प्रमाणावर टाकण्यात येत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा जैव वैद्यकीय अवशेष व कच-याच्या संपर्कात तेथील मुले व मोकाट कुत्री येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३)असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत **?**

श्री. रामदास कदम (१०-०७-२०१५) : (१) तालुका वैद्यकीय अधिकारी, पंचायत समिती, मावळ आणि ग्रामविकास अधिकारी/सरपंच, ग्रुप ग्रामपंचायत वडगांव मावळ यांचे अहवालानुसार हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

जुनुनवाडी, बोरगलवाडी, अगलगांव, दिग्रस व सायखेडा बोरी (ता.जिंतूर, जि.परभणी) येथे राष्ट्रीय पेयजल व जलस्वराज्य योजनेंतर्गत झालेला गैरव्यवहार

(५०) १६२५० (२०-०४-२०१५). श्री.विजय भांबळे (जिंतूर) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)जुनुनवाडी, बोरगलवाडी, अगलगांव, दिग्रस व सायखेडा बोरी (ता. जिंतूर,जि.परभणी) या गावात राष्ट्रीय पेयजल व जलस्वराज्य योजनेंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनेत मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा जि.प. परभणी यांनी गटविकास अधिकारी, जिंतूर यांना सन २००४ व माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान कळवून देखील कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी असलेल्यांविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (०४-०६-२०१५) : (१) अंशतः खरे आहे.
(२) व (३) मौ.जुनुनवाडी, बोरगलवाडी, अगलगांव, दिग्रस व सायखेडा बोरी या मंजूरी देण्यात आलेल्या नळ पाणी पुरवठा योजनांना कामासाठी अग्रिम देण्यात आला परंतू अग्रिम घेऊनही समित्या कामे करीत नसल्याचे आढळून आल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी गटविकास अधिकारी यांना दि. १६.०१.२०१५ च्या आदेशान्वये संबधितावर गुन्हे दाखल करण्याचे आदेशित केले होते. जुनुनवाडी, बोरगलवाडी, दिग्रस, सायखेडा बोरी या योजनेसाठी दिलेल्या अग्रिमाएवढी मुल्यांकनाची कामे पूर्ण केल्याने त्यांच्यावर फौजदारी कारवाई करण्यात आलेली नाही. परंतू मौ.अंगलगाव येथील समितीने काम सुरु केले नसल्यामुळे त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
नागपूर.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.